अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र३/१७३५
दिनांक :- १८/०६/२०२०

## -: कार्यालयीन परिपत्रक:-

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कार्यकारी अभियंता (विद्युत), कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), उप अभियंता (स्थापत्य), उप अभियंता (विद्युत), उप अभियंता (यांत्रिकी), शाखा अभियंता (स्थापत्य), शाखा अभियंता (विद्युत), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावरील अधिकारी/ सेवक यांची सेवाजेष्ठता यादी अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :-
१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११
२) अति. महापालिका आयुक्त (इ) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(इ)/साप्र/१६५७ दि.१०/०६/२०१९.
३) मे. उच्च न्यायालय रिट पिटीशन (st) नं.३१२७०/२०१४ श्री. सुशिल गणेशराव तायडे व इतर.
४) कार्यालयीन परिपत्रक जा.क्र.अतिमआ(इ)/साप्रवि/आस्था/ ३२०५, दि.२६/०७/२०१९.(अंतिम यादी)
५) मा. अति. महापालिका आयुक्त (ज), ठराव क्र. १/०८ दि.१७/०४/२०२०.

संदर्भ क्र. १ व २ चे आदेशातील निर्देश विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील विषयाकिंत नमूद सेवकांची दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/१२/२०१९ अखेर तात्पुरती अतिरिक्त सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत करणेसाठी प्रसृत करून अंतिम करावयाची आहे. त्यानुषंगाने खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे,

१) पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील विषयाकिंत नमूद सेवकांची दि.३१/१२/२०१८ अखेर सेवाज्येष्ठता यादी संदर्भ क्र. ४ अन्वये अंतिम प्रसिद्ध केलेली आहे. दि.३१/१२/२०१८ अखेर अंतिम सेवाज्येष्ठता यादीस मा. अति. महापालिका आयुक्त (इ) यांची ठराव क्र.१/२९०, दि.२६/०७/२०१९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदरची यादी पुणे महानगरपालिका संकेतस्थळावरील https://pmc.gov.in/sites/default/files/circular/3205.pdf या लिंकवर उपलब्ध आहे.

२) त्यानंतर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर सन २०१६ रोजी भरती प्रक्रियेद्वारे तसेच श्री. छत्रपती शिवाजी तंत्र माध्यमिक शाळा केंद्र येथे अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (विद्युत) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या हुद्याच्या रिक्त जागांवर समायोजनाने नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. दि.३१/१२/२०१८ अन्वये प्रसिद्ध केलेल्या अंतिम सेवाजेष्ठता यादीतील अंतिम क्रमांकानंतर सदर सेवकाना समाविष्ठ करून प्रारूप सेवाज्येष्ठता यादी या कार्यालयीन परिपत्रकासोबत प्रसिद्धीस दिलेली आहे.

३) संदर्भ क्र. १ अन्वये मे. शासनाने दिलेले निर्देशानुसार आधीच्या वर्षी प्रसिद्ध झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासूची पुढील वर्षी पुन्हा नव्याने तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची तयार करताना विचारात घेतलेली नसल्याने प्रसिद्ध केलेली नाही. केवळ त्यानंतरचे वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा, वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठतासूची प्रसिद्ध केलेली आहे.